**ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम**
ग्राम आरोग्य पोषण पाणी पुरवठा
व स्वच्छता समितीची पुर्नरचना.

**महाराष्ट्र शासन**
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांक ग्रापापु-११०९/प्र.क्र.०८१/पापु-०७
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ दिनांक: १२ ऑगस्ट, २००९

**वाचा:** १) शासन निर्णय, पा.पु.व स्व.वि.क्र. ग्रापापु-१००१/प्र.क्र.२१०/पापु-०७, दिनांक ३ सप्टेंबर, २००१.
२) शासन निर्णय, पा.पु.व स्व.वि.क्र. ग्रापापु-१००६/प्र.क्र.३६१/पापु-०७, दिनांक ०६ डिसेंबर, २००६.

**प्रस्तावना:**

सन २००० पासून राज्यात ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम मागणी आधारीत समूह सहभागाच्या लोकाभिमूख धोरणानुसार राबविण्यात येत आहे. संदर्भ क्रमांक १ येथील शासन निर्णयान्वये ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या अंमलबजावणीची कार्यपध्दती विहित करण्यात आलेली आहे. याबाबत आवश्यक त्या सूचना वेळोवेळी जिल्हा परिषदांना देण्यात आलेल्या आहेत. या शासन निर्णयान्वये ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम ग्रामस्तरावर राबविण्यासाठी स्थापन करावयाच्या ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीची रचना व तिची कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे. संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये, ग्रामस्तरावरील ग्राम आरोग्य समितीचे विलिनिकरण ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीमध्ये करून या समितीचे नामाभिधान ग्राम आरोग्य, पोषण, पाणी पुरवठा व स्वच्छता समिती असे करण्यात आले आहे. या शासन निर्णयान्वये ग्राम आरोग्य, पोषण, पाणी पुरवठा व स्वच्छता समितीची कार्यकक्षा, कर्तव्ये व जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या आहेत.

३. संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयान्वये ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समितीची स्थापना, सदस्य निवड यासंदर्भात मार्गदर्शन करण्यात आलेले आहे. सद्यस्थितीत या समितीमध्ये ग्रामपंचायतीचे सदस्य निवडण्यात कोणताही प्रत्यवाय नाही. परंतु, समितीचे अध्यक्ष व सचिव कोण असावेत याबाबतचा निर्णय घेण्याची जबाबदारी ग्रामसभेवर टाकण्यात आली आहे. त्यामुळे या समितीवर ग्रामपंचायतीचे सदस्य जरी असले तरी ती ग्रामपंचायतीच्या पूर्ण नियंत्रणातील एक समिती आहे, ही बाब दुर्लक्षिली जाते व ग्रामपंचायत व समिती यांच्या कामामध्ये योग्य तो समन्वय राहत नाही, असे शासनाच्या निदर्शनास आले आहे.

४. ही बाब विचारात घेऊन ग्रामपंचायतीची एक उप समिती असलेल्या ग्राम आरोग्य, पोषण, पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचे पदसिद्ध अध्यक्ष व सचिव निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

१. प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबी विचारात घेऊन, ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या ग्रामस्तरावरील प्रभावी अमंलबजावणीसाठी ग्रामस्तरावर स्थापन करण्यात येणा-या ग्राम आरोग्य, **पोषण, पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचे पदसिद्ध अध्यक्षपदी ग्रामपंचायतीचे सरपंच व पदसिद्ध सचिवपदी ग्रामसेवक राहतील असा निर्णय घेण्यात येत आहे.**

२. याव्यतिरिक्त ग्राम आरोग्य, पोषण, पाणी पुरवठा व स्वच्छता समितीची सदस्य निवड, कार्यपद्धती, कर्तव्ये व जबाबदा-या यामध्ये दि. ०३ सप्टेंबर, २००१ व दि. ०६ डिसेंबर, २००६ मधील शासन निर्णयांमध्ये कोणताही बदल होणार नाही.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २००९०८०५१२३९५०००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(श्री. श्री. घोलप)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,
मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता ) यांचे खाजगी सचिव,
मा.राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव
विभागीय आयुक्त (सर्व)
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
सर्व अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद
महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
महालेखापाल, महाराष्ट्र -२ नागपूर (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,नवी मुंबई
उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,नाशिक, पुणे,औरंगाबाद, अमरावती व नागपूर
सर्व प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
सर्व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय, मुंबई
मंत्रालयातील इतर सर्व विभाग,
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
निवडनस्ती, कार्यासन क्रमांक पापु-०७

एच-१४३१ -१३अ. ..........

F:\२००९\GR०९-१\CR ०८२ ०९ GR ०२०८०९.doc